MHKO100004002015

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १०५/२०१५</u>**

शिवाप्पा चिनगोंडा .
//वि//
चन्नव्वा खजगुनट्टी.

**<u>निशाणी क्र. ४५  खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "पुरावा बंद" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम व आदेशात्मक मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे सन २०१५ साली दाखल असुन ते वादीच्या पुराव्याकरीता ब-याच कालावधीपासुन प्रलंबीत असुन देखील वादीने पुरावा दाखल न केल्यामुळे दिनांक १५/१२/२०२५ रोजी वादीचा पुरावा बंद करण्यात आला. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादी यांनी असे कथन केले आहे की, दरम्यानचे काळात वादी हे आजारी होते व अशक्त होते. त्यामुळे त्यांना बाहेरही पडता येत नव्हते. त्यामुळे ते मे.न्यायालयात हजर राहिले नाहीत अगर राहता आले नाही. प्रतिवादीतर्फे वकीलांनी अर्जास हरकत घेतली व अर्जात योग्य ती कारणे नमुद केली नसल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. दाखल अर्ज व म्हणणे वाचले. प्रस्तुत अर्जात नमुद कारण संयुक्तीक वाटत नाही. कारण वादी यांना पुराव्याकामी हजर राहण्यासाठी वारंवार संधी देण्यात आलेली आहे. शेवटी, प्रस्तुत प्रकरण जुने असल्यामुळे वादी यांचा पुरावा बंद केला. परंतु, दाव्याचा निकाल गुणदोषावर लावण्यासाठी वादी यांना संधी देणे आवश्यक आहे. वादीमुळे झालेला विलंब व त्यामुळे प्रतिवादींचे झालेले नुकसान याकरीता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

**०१.** अर्ज रक्कम रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**०२.** खर्चाची रक्कम वादी यांनी पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी यांना अदा करावी. तसे न

झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्द समजण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

SACHIN DURGASHANKAR MEHTA

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.04.24 15:24:26 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २४/०४/२०२६.